# कार मालकाचे अपहरण करुन खुन करणाऱ्या दोन्ही भावांना जन्मठेपेची शिक्षा

(आव्हाणात्मक खुनाचा तपास सन २०१४ मध्ये स्था.गु.शा. ने उघडकीस आणुन तपास करण्यात आला.)

सन २०१३ मध्ये पाटबंधारे विभाग नांदेड येथून वाहन चालक पदावरुन गोरखनाथ किशनराव सुर्यवंशी रा. भगीरथनगर नांदेड हे सेवानिवृत्त झाले होते. सेवानिवृत्तीनंतर उपरनिर्वाहासाठी त्यांनी निवृत्ती वेतनामधुन एक स्वीफट कार क्रमांक एमएच २६ अेके- १२४८ ही भाडे तत्वावर चालविण्यासाठी घेवून लहान सहान भाडे मारुन आपली उपजिवीका भागवित होते.

दिनांक १०.०६.२०१४ रोजी देगलुर तालुक्यातील सावरंगाव येथील भाडे केले. ते रात्री साडेनऊ वाजताचे सुमारास परत आले. त्याच दरम्याण दुपारी त्यांना फोनवरुन एक बोधन येथील भाडे मिळाले होते. सदर व्यक्तीने एक महीण्यापूर्वी वाहन भाडयाने वापरलेले असल्याने त्यांचे तोंड ओळखीवरुन गोरखनाथ यांनी ते भाडे स्वीकारले. साडेनऊ वाजता सावरगावं येथून परत आल्यानंतर गोरखनाथ सुर्यवंशी हे ठरल्याप्रमाणे हिंगोली गेट येथे गेले. तेथुन त्यांनी घरी फोन करुन सांगितले की, मी आताच सावरगांव येथून परत आला व मला बोधनचे भाडे भेटले आहे ते भाडे करुन रात्री दोन वाजतापर्यंत घरी येतो म्हणुन निरोप दिला. त्यांनतर गोरखनाथ यांनी भाडे घेवून गेले.

गोरखनाथ सुर्यवंशी हे दुसरे दिवशी परत न आल्याने त्यांचे घरचे लोकांनी त्यांना फोनवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला परंतू त्यांचा मोबाईल बंद अवस्थेत होता. दिवसभर वडील घरी न आल्याने मुलगा अजयकुमार सुर्यवंशी यांनी वारंवार फोन करुनही वडीलांचा फोंन बंद येत असल्याने त्यांनी दिनांक १२.०६.२०१४ रोजी पोलीस स्टेशन भाग्यनगर येथे वडील मिसींग झाल्याबाबतची तक्रार दिली. त्या तक्रारीवरुन भाग्यनगर मिसींग क्रमांक ३७/२०१४ प्रमाणे दाखल करुन चौकशी पोना दारासिंग राठोड यांनी केली. चौकशीत गोरखनाथ सुर्यवंशी यांचे वाहनासह अपहरण झाल्याचे निष्पन्न झाल्याने अजय गोरखनाथ सुर्यवंशी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन भाग्यनगर येथे गु.र.न. ११३/२०१४ कलम ३६४(अ), ३६५ भादंवि प्रमाणे अपहरण केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. वडीलांचा व वाहनाचा काहीएक पत्ता लागत नसल्याने अजय सुर्यवंशी यांनी अपर पोलीस अधिक्षक श्री. तानाजी चिखले यांना संपर्क साधुन शोध लावण्याची नम्र विनंती केली, त्यांच्या विनंतीवरुन मा. पोलीस अधिक्षक श्री. परमजीत सिंह दहिया, अपर पोलीस अधिक्षक श्री. तानाजी चिखले यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीधर पवार यांना प्रकरणात तात्काळ दखल घेवून गोरबखनाथ सुर्यवंशी यांना शोध लावण्याची जबाबदारी सोपविली. त्याप्रमाणे त्यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी आण्णा डोईफोडे, पोलीस नाईक/२०८३ दत्तराम जाधव, पोना/११२६ ज्ञानेश्वर तिडके, पोकॉ/१३६० बालाप्रसाद जाधव, चापोहेकॉ/२८२५रमाकांत शिंदे, पोना/११७८ सुभाष आलोने, पोकॉ/१५१ बालाजी सोनटक्के यांचे एक पथक व पोलीस स्टेशन भाग्यनगरचे सपोनि पाटील, पोना दारासिंग राठोड, पोकॉ बयास, पोकॉ जाधव व स्था.गु.शा. चे बालाजी सातपुते यांचे पथक गठीत केले.

सदर पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी अहारोत्र मेहनत घेवून प्रकरणाचा छडा लावण्यासाठी प्रयत्न करीत असतांना सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी आण्णा डोईफोडे यांचे पथकाला यातील भाडे ठरविणाऱ्या व्यक्तीविषयी माहीती मिळाली. त्याप्रमाणे सदर पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी हैद्राबाद, मखतळ, महेबुबनगर अशा बऱ्याच ठीकाणी शोध घेतला परंतू सदर ईसम हा बोधन येथे लॉजमध्ये असल्याची माहीती मिळाल्यावरुन परत बोधन येथे येवून भाडयाने कार ठरविणाऱ्या ईसमास ताब्यात घेतले. त्यास त्याचे नावगांव विचारता त्यांनी आपले नांव १) शेख पाशा उर्फ पवन पिता शेख राजमोहमद उर्फ राजामियॉ रा. झाडी ता. बोधन जि. निझामाबाद ह.मु. मकतळ जि. महेबबनगर आंध्रपदेश,असे सांगितले. त्यास प्राथमीक विचारणा

करता त्यांनी उडवाउडविची उत्तरे दिली. त्यास अधिक विश्वासात घेता त्यांनी कार चोरी केल्याची माहीती देवून कार दाखविली. त्या कारवर एपी/२५- एएनल-४९४९ क्रमांकाची नंबर प्लेट चढविण्यात आली होती. त्या कारची खात्री करता ती गोरखनाथ सुर्यवंशी यांची असल्याची खात्री झाली. त्यावरुन त्यास गोरखनाथ सुर्यवंशी यांचेबाबत विचारणा केली. त्यांनी सांगितलेली हकीकत पोलीसांना सांगीतली तेव्हा पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचारी हैराण झाले. ती हकीकत अशी,

सुमारे एक महीण्यापूर्वी नांदेड येथे गोरखनाथ सुर्यवंशी यांनी कार भाडयाने वापरली असल्याने त्यांनी मला त्यांचे व्हीजीटींग कार्ड दिले होते. त्यांचा स्वभाव शांत असल्याने मी त्यांची गाडी भाडयाने ठरवून चोरी करण्याचे ठरविले. त्याप्रमाणे दिनांक १०.०६.२०१४ रोजी गाडी भाडयाने करण्यासाठी नांदेडला आलो.नांदेड शहरात ज्योती टॉकीजमध्ये सिनेमा पाहीला. त्यानंतर हिंगोली गेट येथे येवून गोरखनाथ सुर्यवंशी यांचे व्हीजीटींग कार्डवरील नंबर कॉईनबॉक्स वरुन डाईल करुन गोरखनाथ यांना बोललो तेव्हा त्यांनी मला ओळखले नाही. नंतर मी त्यांना माझे मोबाईलवरुन बोललो, तो क्रमांक त्यांच्या मोबाईलमध्ये सेव्ह असल्याने त्यांनी मला ओळखले व भाडयाने येण्याची ग्वाही दिली. त्यावरुन मी हिंगोली गेट जवळ सहा वाजता पासुन त्यांची वाट पाहत होतो. मी माझे मोबाईलवरुन संशय येईल म्हणुन त्यांना कॉईन बॉक्स व ईतर वाटसरु लोकांचे मोबाईल वरुन संपर्क साधु लागलो. त्याप्रमाणे गोरखनाथ हे रात्री साडेनऊ वाजताचे सुमारास हिंगोली गेट येथे आले. त्याचे गाडीमध्ये मी बसून नर्सी मार्गे बोधनला जाण्याकरीता निघालो. नर्सी येथे नारळपाणी पिण्याकरीता गाडी थांबविली व तेथुन गाडी चोरी करण्याचा प्रयत्न केला परंतू मला संधी मिळाली नाही. कारन गोरखनाथ सुर्यवंशी हे गाडीचे खाली उतरत नव्हते. नर्सी येथून निघाल्यानंतर मी माझा भाऊ सैलानीबाबा यास फोन करुन बिलोली येथे बोलावून घेतले. व त्यास घरातील सज्जावर ठेवलेले वायर घेवून येण्याकरीता सांगितले. त्यांनतर आम्ही दोघेजन बिलोली येथे आला. तेथे लघवीसाठी गाडी उभी करुन गाडी चोरण्याचा प्रयत्न केला तेथेसुध्दा काही संधी मिळाली नाही. तेवढयात माझा भाऊ सैलानी बाबा हा बिलोली येथे आला. त्यास ड्रायव्हर गोरखनाथ यांचे बाजुला बसवून मी पाठीमागील सिटवर आलो. तेथुन निझामाबाद रोडवर आलो असतांना निझामाबादचे अलीकडे दहा कि.मी. अंतरावर निर्मणुष्य ठीकाणी गोरखनाथ यांना उजव्या बाजुला जाणाऱ्या कच्च्या रोडवर गाडी नेण्यास सांगून तेथुन आपणाला एक ईसमाला सोबत घ्यायचे आहे असे सांगितले. त्याप्रमाणे गाडी कच्च्या रोडवर येताच रोड खराब व खडयांचा असल्याने कारचा वेग कमी झाला. त्याची संधी घेवून मी खिशातील वायर काढून गोरखनाथ यांचे गळयाला आवळले. त्याचवेळी माझ्या भावाने गोरखनाथ यांचे तोड दाबुन बुक्कयांनी मारहान करण्यास सुरुवात केली. भाऊ सैलानी यांचे हाताचे बोटात अंगठी असल्याने गोरखनाथ यांचे तोडावर लागून त्यांचे रक्त निघाले होते. तेवढयात गोरखनाथ बेशुध्द झाले. त्यानंतर मी गाडी वळवून घेवून गोरखनाथ यांना गाडीखाली ढकलून दिले. गोरखनाथ सुर्यवंशी यांचे ओळख पटू नये म्हणुन आम्ही दोघा भावांनी त्यांचे अंगावरील कपडे व ईतर साहित्य काढून घेतले व गाडी रिव्हर्समध्ये दोन वेळा त्यांच्या अंगावर चढविली व त्यांचे प्रेत दोघांनी मिळुन झुडुपात ढकलुन दिले. त्यांनतर आम्ही तेथुन कारसह आमचे गावी आलो येतांना रस्त्यातच गोरखनाथ यांचे कपडे व साहित्य, मोबाईल निझामाबाद येथे वेगवेगळ्या ठीकाणी फेकून दिले. गावी मुक्काम करुन दुसरे दिवशी मखतळ जि. महेबुबनगर यागावी जातांना निझामाबाद येथे कार वॉशींग करुन घेतली व मेडचेल या गावी कारला एपी -२५ अेएन- ४९४९ क्रमांक टाकुन गाडी वापरल्याची कबुली दिली.

त्यावरुन पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी गोरखनाथ यांचेबाबत पोलीस स्टेशन निझामाबाद ग्रामीण येथे जावून चौकशी केली असतांना त्याठीकाणी गोरखनाथ यांचा खुन झाल्याची खात्री झाली. निझामाबाद ग्रामीण पोलीसांनी मयत गोरखनाथ सुर्यवंशी यांचे खुना सबंधाने सविस्तर गुन्हा नोंदवून मयताचे प्रेतावर अनोळखी म्हणुन त्यांचा दफनविधी केला होता.

गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून मा.पोलीस अधिक्षक, श्री. दहिया साहेब यांनी सदर गुन्हयाचा तपास स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक, श्री. शिवाजी आण्णा डोईफोडें यांना करणेबाबत सुचना दिल्या त्याप्रमाणे त्यांनी तपासाचे काम हाती घेतले.

दिनांक २१.०६.२०१४ रोजी सदर गुन्हयात मयत सुर्यवंशी यांचे मारेकरी १) शेख पाशा उर्फ पवन पिता शेख राजमोहमद उर्फ राजामियॉ रा. झाडी ता. बोधन जि. निझामाबाद ह.मु. मकतळ जि. महेबबनगर आंध्रपदेश, २) शे. सैलानी बाबा पिता शे. राजमोहमद उर्फ राजामियॉ रा. झाडी ता. बोधन जि. निझामाबाद यांना गुन्हयात अटक करुन दिनांक २९.०६.२०१४ रोजी पावेतो पोलीस कोठडी रिमांड मंजुर करुन त्यांचेकडे तपास करता त्यांनी गुन्हयाची कबुली दिले. सदर आरोपीतांकडुन पोलीसांनी १) बोधन येथून मयताची कार, २) निझामाबाद येथून मयताचे अंगावरील कपडे, मयताचे गळयाला आवळलेले वायर, गाडीतील कागदपत्र, आरोपी सैलानी बाबा यांचे अंगावरील कपड रक्ताने भरलेले, ३) मखतल जि. महेबुबनगर येथून मयताचे गाडीच्या मुळ नंबरप्लेट , ४) मयताचे खिशातील ओळखपत्र व गाडीतील टुलकिट असे साहीत्य जप्त केले. आरोपीविरुध्द गुन्हा केल्या ईतपतचा पुरावा हस्तगत करुन दोन्ही आरोपीतांविरुध्द मा. न्यायालयात मुदतीत दोषारोप पत्र सादर करण्यात आले.

आज दिनांक १४.०३.२०१८ रोजी मा. जिल्हा सत्र न्यायाधीश नांदेड श्री. देशपांडे मॅडम यांचे न्यायालयात प्रकरणाची अंतीम सुनावनी झाली. त्यामध्ये सरकारतर्फे ॲड. कागणे व कुर्तुडीकर मॅडम यांनी काम पाहीले. तसेच पैरवी अधिकारी म्हणुन सपोनि आत्राम पो.स्टे. भाग्यनगर यांनी काम पाहीले आहे. संपूर्ण सुनावनीचे अंती मा. न्यायालयाने दोन्ही भाऊ आरोपीतांना जन्मठेपीची शिक्षा सुनावली आली.